MHKO180000252026

**नियमीत दिवाणी दावा क्र.०८/२०२६ मधील**

**निशाणी क्र.५२ खालील आदेश.**

**[सिकंदर बंडू मुजावर व इतर वि. मुज्झमिल मेहबूब शेख व इतर]**

तूर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यावर प्रतिवादी क्र.१ यांच्याविरुध्द पारीत करण्यात आलेला 'जैसे–थे' चा आदेश सदर अर्जाच्या अंतिम निकालापावेतो कायम करण्याकरीता वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०३. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. उभयपक्षांनी त्यांच्या कथनानुरुप युक्तीवाद केला आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांच्याविरुध्द दिनांक २०.०१.२०२६ रोजीच्या निशाणी क्र.५ वरील आदेशानुसार वाद मिळकतीसंदर्भात 'जैसे–थे' परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारीत करण्यात आला होता. निशाणी क्र.३३ वरील आदेशानुसार न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करुन वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१ यांची मिळकत संयुक्तपणे मोजणी करुन त्याबाबतचा अहवाल व नकाशा अभिलेखावर दाखल करण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. न्यायालयीन आयुक्तांनी निशाणी क्र.४६ वर अहवाल दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदर अहवाल दाखल झाल्यानंतर वादींनी उक्त अहवालाच्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता निशाणी क्र.५४ अन्वये दुरुस्ती अर्ज आज रोजी दाखल केला आहे. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणणे दाखल केले असून प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी उक्त अर्जावर म्हणणे दाखल करण्याकरीता प्रकरण प्रलंबीत आहे. तसेच, न्यायालयीन आयुक्तांनी दाखल केलेल्या अहवालाचा खुलासा होण्याकरीता सदर आयुक्तांना साक्षीसमन्स काढण्याबाबत वादींनी निशाणी क्र.५५ अन्वये अर्ज दाखल केला आहे. याउलट, वादींनी अनावश्यक व खोटा दावा दाखल केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचे बांधकाम बरेच दिवस झाले थांबले असून बांधकामाचे साहित्य अनेक दिवसांपासून जागेवर पडून असल्यामुळे नुकसान होत असल्याचे प्रतिवादी क्र.१ यांच्या विद्यमान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमूद केले आहे. सबब, उभयपक्षांचे कथन, युक्तीवाद, न्यायालयीन आयुक्तांनी दाखल

केलेला अहवाल आणि निशाणी क्र.५४ व ५५ वरील अर्जांचा विचार करता, प्रतिवादी क्र.१ यांना पुढील तारखेपर्यंत वाद मिळकतीच्या पुर्व व पश्चीम बाजूला 'जैसे–थे' परिस्थिती कायम ठेवण्याबाबत आदेशीत करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रतिवादी क्र.१ यांनी पुढील तारखेपर्यंत वाद मिळकतीच्या पुर्व व पश्चीम बाजूला 'जैसे–थे' परिस्थिती कायम ठेवावी.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.16 17:58:27 +0530

दिनांक : १६.०३.२०२६ (बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड. प्रभारी सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कुरुंदवाड.